# इच्छापत्र

ॲड (डॉ) संतोष अ. शहा,

कोल्हापूर



# इच्छापत्र का करावे

- स्वत:च्या मालमत्तेचे स्वत:चे मर्जीप्रमाणे व्यवस्था करता येते.
- पुढील पिढयांमधील वाद टळतो.
- इच्छापत्र न केलेने कायदयाच्या नियमाप्रमाणे मिळकतीची व्यवस्था होते जी व्यक्तीच्या इच्छा व गरजास अनुसरून असेलच असे नाही.
- आपल्या जवळच्या व्यक्तीस अथवा जास्ती गरजू व्यक्तीस अधिकची मिळकत देणे शक्य असते.
- इच्छापत्र न केलेस आपली मिळकत नावडत्या व्यक्तीस व गरज नसलेल्या व्यक्तीस मिळणेचा अधिकार प्राप्त होवू शकतो.

# हिंदू सक्सेशन ॲक्ट

- हिंदु, विरशैव, लिंगायत, बुध्द, जैन, शिख –
- मृत्यूपत्र न करता पुरूषाचे निधन झालेस मालमत्तेचा वारसा हक्क
- – मुलगा,मुलगी, पत्नी, आई यांचेमध्ये  समान हक्काने विभाजन
- मृत्यूपत्र न करता स्त्रीचे निधन झालेस मालमत्तेचा वारसा हक्क –
- – मुलगा, मुलगी व नवरा यांचेमध्ये समान हक्काने विभाजन
- मुस्लिम कायदा, ख्रिश्चन कायदा वेगळा.
- समान नागरी संहिता ?

# इच्छापत्र करणेची प्रक्रिया

- इच्छापत्र कायदयाने निर्माण केलेला अत्यंत सोपा दस्त आहे.
- सैनिकांसाठी तोंडी इच्छापत्रास देखील कायदेशीर समजले जाते.
- इच्छापत्रास कोणत्याही स्टॅम्पची अथवा कायदेशीर क्लिष्ट भाषेची आवश्यकता नाही.
- एका साध्या कागदावर स्वत:ची माहिती, आप्तजणांची माहिती, आपल्या मिळकतीचे वर्णन व सदर मिळकत कोणाला दयावयाची आहे हे स्पष्टपणे लिहावे.

# इच्छापत्र करणेची प्रक्रिया

- इच्छापत्रावर दोन साक्षीदार असणे कायदयाने आवश्यक आहे,
- वैदयकिय दाखला कायदयाने आवश्यक नाही मात्र तो असणे केव्हाही चांगले.
- इच्छापत्रामध्ये संदिग्धता, क्लिष्टत: व अनेक अटी असू नयेत.

# इच्छापत्र करणेची प्रक्रिया

- इच्छापत्र नोटराईज्ड किंवा रजिस्टर्ड करणे कायदयाने आवश्यक नाही पण केलेले चांगले. त्यामुळे पुढील वाद टळू शकतात.
- इच्छापत्राबाबत शंका असतील किंवा इच्छापत्र जास्ती किचकट स्वरूपाचे, जास्ती मिळकतीबाबत अथवा ज्या मिळकतीबाबत आपल्याला नक्की माहिती नाही किंवा केवळ एखादी मिळकत एखादया व्यक्तीच्या हयातीपर्यंत राहणेसाठी असेल व नंतर कोणाला अशी गुंतागुंत असणारे इच्छापत्र करावयाचे झालेस वकीलांचे सल्याने केलेले केव्हाही चांगले.

# इच्छापत्र करणेची प्रक्रिया

- दोन साक्षीदार शक्य तितके तरूण असावेत, नाव, वय, व्यवसाय, पत्ता, सही
- इच्छापत्राचे लाभार्थी साक्षीदार होवू शकत नाहीत.
- वैदयकिय दाखला (शारिरीक व मानसिक स्थितीबाबत) अनिवार्य नाही पण घेतलेला चांगला
- नोटरायझेशन
- सर्वात चांगले म्हणजे रजिस्टेशन, त्यासाठी दोन साक्षीदारांशिवाय आणखी दोन ओळखीच्या व्यक्ती आवश्यक.
- आपण केलेले इच्छापत्र कितीही वेळा रदद करून ते पुन्हा करता येते.
- प्रत्येक इच्छापत्रात हे शेवटचे इच्छापत्र आहे असे नमूद करणे आवश्यक.

# इच्छापत्राचा सोपा नमूना

- १. संपूर्ण नाव, वय, व्यवसाय, पत्ता, व स्वत:च्या शारिरीक व मानसिक परिस्थितीबाबत थोडक्यात वर्णन, इच्छापत्र करणेचे कारण व त्याचे परिणाम समजत असलेची स्पष्टता
- २. आपल्या वारसांवे नाव, पत्ता व संक्षिप्त माहिती
- ३. आपल्या जंगम व स्थावर मिळकतीचे वर्णन
- • सर्व जंगम मालमत्ता, बॅंक अकौटस, एफ.डीज, डिमॅट अकौट, म्युच्युअल फंड, पोस्ट ऑफिस, पी.पी.एफ, एल.आय.सी. पॉलिसीज व अशा प्रकारच्या अन्य गुंतवणुकी , कॅश, सोने, चांदी, गाडी व इतर जंगम मिळकती
- • स्थावर मिळकती - ७/१२ किंवा प्रॉपर्टी कार्ड/ खरेदीपत्र/ करारपत्र, म्युनिसिपल रेकॉर्ड इत्यादीमध्ये नमूद केलेप्रमाणे संपूर्ण वर्णन

- ४. उपरोक्त मिळकती स्वकष्टार्जित आहेत किंवा वाडवडिलार्जित आहेत याची स्पष्टता
- ५. उपरोक्त मिळकती आपल्या पश्चात कोणास दयावयाच्या आहेत याची पूर्ण स्पष्टता
- ६. उरलेल्या मिळकती/ अवशिष्ट मिळकती. : उपरोक्त नमूद मिळकती सोडून इतर कोणत्याही मिळकती असलेस त्या कोणास मिळाव्यात याबाबत तरतूद
- स्थळ
- दिनांक

**इच्छापत्र करणा-याची सही**

**साक्षीदार क्र १**

**साक्षीदार क्र २**

# इच्छापत्र कधी करावे

- ज्याक्षणी व्यक्तीच्या नावे काही मालमत्ता निर्माण होईल त्याक्षणी इच्छापत्र करावे ?
- सामान्यत: निवृत्ती वयाच्या वेळी इच्छापत्र करावे.
- वारसांची संख्या वाढलेस इच्छापत्र करणे गरजेचे आहे.
- केवळ समान हिश्याने आपले सर्व वारसांना सर्व मिळकत न देता प्रत्येक वारसाला वेगळी वेगळी मिळकत देणे हिताचे होवू शकते.

# काही उदाहरणे/ अटी

- अटी बेकायदेशीर अथवा अनैतिक असू नयेत.
- आपल्या धर्माच्या पेक्षा वेगळया धर्माच्या मुलीशी लग्न केलेस मिळकत मिळणार नाही. अशी अट ?
- सामाजिक अथवा धर्मादाय कारणासाठी काही मिळकत दिलेस चालू शकते.
- आपल्या संपूर्ण मिळकतीबाबत ट्रस्ट करणे चालू शकते.
- इच्छापत्र करणा—या व्यक्तीस त्याच्या हयातीत इच्छापत्रातील मिळकतीबाबत मिळकत उपभोग करणे अथवा विकणे इत्यादीबाबत कोणतेही बंधन नसते.

# एक्झीक्युटर

- इच्छापत्रामध्ये एक्झीक्युटर नेमणे अनिवार्य नाही.
- अटी व शर्तींचे , अनेक मिळकतीचे इच्छापत्र असलेस व वारसांमध्ये समन्वय नसलेस एक्झिक्युटर नेमणे हितावह ठरू शकते.
- एक्झीक्युटर हे इच्छापत्रास साक्षीदार असू शकतात पण लाभार्थी असू शकत नाहीत.
- एक्झिक्युटर नेमला असलेस इच्छापत्र सिध्द करणेची जबाबदारी एक्झीक्युटरची असते.

# नॉमिनेशन/इच्छापत्राची अंमलबजावणी

- नॉमिनी हा ट्रस्टी असतो. नॉमिनीने मिळालेली मिळकत इच्छापत्राप्रमाणे वाटणे त्याचे कर्तव्य असते.
- नॉमिनेशन व इच्छापत्र यामध्ये सुसंगती असावी.
- नॉमिनेशन नसेल तर जंगम मिळकतीबाबत इच्छापत्र न्यायालयामधून सिध्द करून प्रोबेट किंवा लेटर ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन घेणे.
- स्थावर मिळकतीबाबत इच्छापत्र सरकारी महसूल कार्यालयाकडे अथवा न्यायालयाकडून सिध्द करून घेवून प्रोबेट / लेटर ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन घेणे आवश्यक.
- स्थावर मिळकतीबाबत सहकारी संस्थांमध्ये नॉमिनेशन केले जाते.
- इच्छापत्राबाबत महसूल कार्यालयामध्ये वाद निर्माण झालेस इच्छापत्र न्यायालयातून सिध्द करून घेणे आवश्यक.


# अंतिम न बरा होणारा आजार / परिस्थिती

- सर्वोच्च न्यायालय : कॉमन कॉज विरूध्द युनियन ऑफ इंडिया (२०१८ )
- अंतिम न बरा होणारा आजार / परिस्थिती निर्माण झालेस वैदयकिय जीवन आधार काढून घेणेसाठी दस्त करणेचा कायदेशीर अधिकार व प्रक्रिया.
- दोन साक्षीदार, ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट
- प्रत आपल्या फॅमिली डॉक्टरांकडे देणे योग्य.

# अवयवदान व शरिरदान

- भारतात निकडीची गरज.
- वेगळा फॉर्म भरून देणे.
- अवयवदान व शरिरदान हे आयुष्यातील सर्वश्रेष्ठ दान आहे.
- याचा उल्लेख इच्छापत्रात केलेस ते हितावह असते.

# “Winston Churchill”



# A New Beginning



# *“Thank You…”*

Adv. Dr. Shah & Associates
Phone : +91 231 253 7717, +91 231 253 6816
Mobile : +91 98230 13441
Email : advdrshah@gmail.com
Website : advdrshahnassociates.com